**नगरपंचायत अध्यक्ष पदाच्या थेट निवडणुकांसाठी राजकीय पक्षांनी पुरस्कृत उमेदवारांकरीता द्यावयाचे जोडपत्र-१ व २ विहित करणेबाबत.**

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.८४/का.११
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७/११/२०१७

## आदेश

ज्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए नुसार राज्यातील नगरपालिका निवडणुकांचे आयोजन करण्याच्या कामाचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण करण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी; शासनाने दि.०२/११/२०१७ च्या अध्यादेशाद्वारे नगरपंचायतींमधील अध्यक्षांची निवड थेट निवडणुकीद्वारे करण्याबाबतची तरतूद अधिनियमात केलेली असल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.एसईसी/आरपीपी/२००९/सी.आर४९/का.११, दि.३१/०३/२००९ च्या आदेशातील (महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप)) आदेश,२००९ च्या परिच्छेद ९ मधील तरतुदीनुसार एखाद्या उमेदवारास अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी नोंदणीकृत पक्षातर्फे पुरस्कृत केले असल्याचे समजण्यासाठी विहित नमुन्यातील लेखी सूचनापत्र नामनिर्देशपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सूपूर्द करणे (पोहचविणे) आवश्यक आहे व त्यासाठी नमुना विहित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी; शासनाने नगर पंचायतींमधील अध्यक्ष पदाच्या थेट निवडणुका घेण्यासाठी निवडणूक नियम, २०१७, दि.१३/११/२०१७ च्या अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केले असून त्यामधील नियम १६(२) मधील तरतूद लक्षात घेता अध्यक्ष पदाच्या निवडणुकीकरिता राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात येणाऱ्या उमेदवारांना एक सूचक व अपक्ष उमेदवारांना ५ सूचक देण्याची तरतूद आहे.

त्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०-अ(४) खालील व इतर सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.एसईसी/आरपीपी/२००९/सी.आर४९/का.११, दि.३१/०३/२००९ च्या आदेशातील (महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप)) आदेश, २००९ च्या परिच्छेद ९ मधील तरतुदींच्या अनुषंगाने नगरपंचायतींमधील अध्यक्ष पदाच्या थेट निवडणुकांसाठी राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात येणाऱ्या उमेदवाराने या आदेशासोबत विहित केलेले जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मधील सूचनापत्र नामनिर्देशनपत्र दाखल करावयाच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि.ज.वागळे)
प्रभारी उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व नगर पंचायतींचे मुख्याधिकारी.
सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष.
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.

(राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र. ८४ /का.११, दि.१७/११/२०१७ च्या सोबतचे सहपत्र)

## जोडपत्र - १

## राजकीय पक्षांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींबाबत द्यावयाचे सूचनापत्र.

(केवळ नगर पंचायतींच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकांसाठी लागू)

प्रति,

१) जिल्हाधिकारी, जिल्हा------------

२) ------------निवडणूक निर्णय अधिकारी------------नगरपंचायत अध्यक्ष निवडणूक

विषय :- सार्वत्रिक निवडणूक-----------नगर पंचायत, जिल्हा------------
चिन्ह वाटपासाठी उमेदवारांची नावे कळविण्याचेदृष्टीने व्यक्तींना प्राधिकृत करणेबाबत.

महोदय,

मी, याद्वारे ---------------- हा पक्ष, जो राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष / राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष / नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्ष असून, वरील नगर पंचायत अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी सदर पक्षाद्वारे पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींची नावे खालीलप्रमाणे कळवू इच्छितो :-

| सूचनापत्र पाठविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव / व्यक्तींची नावे (१) | पक्षामध्ये धारण करीत असलेले पद (२) | नगर पंचायत याबाबत प्राधिकृत (३) |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

२. वर नमूद केलेल्या व्यक्तींची / व्यक्तींच्या नमुना स्वाक्षऱ्या खालीलप्रमाणे आहेत :-

(१) श्री. -------------------- यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) ------------------------------ (ब) ---------------------------

(क) ------------------------------

(२) श्री. ---------------------- यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) ------------------------------ (ब) ----------------------------

(क)------------------------------

(३) श्री. ---------------------- यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) ------------------------------ (ब) ----------------------------

(क) ------------------------------

आपला विश्वासू,

ठिकाण :

दिनांक :

अध्यक्ष. सचिव/

(शाईची अथवा बॉलपाईंट पेनची स्वाक्षरी)

पक्षाचे नाव

पक्षाची मुद्रा (सील)

टीपः- सदर सूचनापत्रावर पक्षाचे अध्यक्ष, सचिव अथवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्यांची शाईने अथवा बॉलपाईंट पेनने स्वाक्षरी केलेली असावी.

(राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.८४/का.११, दि.१७/११/२०१७ च्या सोबतचे सहपत्र)

## जोडपत्र - २

### राजकीय पक्षांतर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे कळविणारे सूचनापत्र.

(केवळ नगर पंचायतींच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकांसाठी लागू)

प्रति,

१) जिल्हाधिकारी, -------------- जिल्हा

२) ------------------ निवडणूक निर्णय अधिकारी, ----------- नगरपंचायत अध्यक्ष पदाची निवडणूक

विषय :- ------------- नगर पंचायत, अध्यक्ष पदाची निवडणूक
जिल्हा ------------------ उमेदवार उभे करणेबाबत.

महोदय,

---------------- पक्षातर्फे --------------- नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुकीमध्ये अध्यक्ष पदाकरिता उभे करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे मी खालीलप्रमाणे कळवू इच्छितो :-

| नगर पंचायतीचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराच्या वडिलांचे / पतिचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराचा पोस्टाचा पत्ता | मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये रद्द झाल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास, त्याची जागा घेणाऱ्या पर्यायी उमेदवाराचे नाव | पर्यायी उमेदवाराच्या वडिलांचे/ पतिचे नाव | पर्यायी उमेदवाराचा पोस्टाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

आपला विश्वासू,

ठिकाण :
दिनांक :

नावे कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या
व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी.
(शाईची अथवा बॉलपाईंट पेनची स्वाक्षरी)
पक्षाचे नाव
पक्षाची मुद्रा (सील)

टीप:- १) सदर सूचनापत्रावर अध्यक्ष, सचिव अथवा अशी सूचना पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्यांची शाईने अथवा बॉलपाईंट पेनने स्वाक्षरी केलेली असावी.